स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Synopsis of theThesis Entitled

: शिर्षक :

“ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत काम करणा—या सफाई कामगारांच्या मानवी हक्कांचा अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
मानव विज्ञान विद्याशाखेतील मानव अधिकार विषयात पीएच.डी पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

सुमित यशवंतराव गजभारे
(एम.ए,एम.फील,नेट)

: मार्गदर्शक :

डॉ. अनिलकुमार जायभाये
(एम.ए,एम.फील,पीएच.डी,सेट)

समाजशास्त्र विभाग प्रमुख,
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वा.रा.ती.म. उपपरिसर
लातुर.

ऑगस्ट —२०२३

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत काम करणा—या सफाई कामगारांच्या मानवी हक्कांचा अभ्यास

प्रास्ताविक:—

विविधतेने नटलेला देश म्हणुन भारत देशाला ओळखले जाते. या विविधतेत हजारो जातीजमातीचा समावेश आपणास प्रामुख्याने पाहावयास मिळतो. जाती व्यवस्था ही एक महत्वपूर्ण वैशिष्टय आपल्या भारतीय समाजव्यवस्थेचे मानले जाते. भारतीय समाजात जात नावाची गोष्ट ही प्राचिन काळापासुन अस्तित्वात असल्याचे आपणास इतिहासाच्या पानातून पाहावयास मिळते.

जात ही अशी स्तरिकरणाचीं व्यवस्था आहे ज्याचा सदस्यत्वासाठी त्या स्तरिय गटातच जन्म घेणे आवश्यक आहे. म्हणजेच जात ही त्या विशिष्ट जातीतच जन्माला आल्याने मिळते. अशी जातीची व्याख्या घुर्ये यांनी आपल्या 'कास्ट ऑड रेस इंन इंडिया' (१९६९) या आपल्या पुस्तकात मांडलेली आपणास पाहावयास मिळते. तसेच,

मुजूमदार आणि मदण यांच्या मते 'जात हा एक बंद वर्ग आहे.' तसेच जेव्हा दर्जा पुर्णपणे पूर्वनिर्धारित असतो आणि दैवाने प्राप्त झालेल्या या दर्जात कोणत्याही प्रकारच्या बदलाची आशा नसते,तेव्हा वर्ग निर्धारण केलेल्या पराकोटीच्या ताठर स्वरूपाला जात असे म्हणतात. असे मत मॅक आयव्हर आणि पेज यांनी जातीबाबत व्यक्त केलेले आहे.

शतकानुशतके माणसे हि जातीच्या चक्रामध्ये फिरत राहीली. जात आणि एक व्यवसाय असे एक सुत्र यामागे होते. सर्वसाधारणपणे सर्व लेकोंचे व्यवसाय हे वंश परंपरागत होते हे आपणास पहावयास मिळते. जातीचा इतिहास म्हणजे व्यवसायाचा इतिहास हे महत्वाचे तत्व कोणी निटपणे लक्षात घेतलेले नाही. प्रत्येक जातीला पारंपारिक किमान एक तरी व्यवसाय आहे. हे जात वास्तव आहे. जातीसंस्था म्हटले की, आपल्या

डोळयासमोर प्रामुख्याने प्रथम त्यातील उतरंड लक्षात येते. कोणतीही जात कोणत्यातरी जातीपेक्षा खालची तर कोणत्यातरी जातीपेक्षा उच्च आज मानली जाते. प्रत्येक जातीला आपला असा एक व्यवसाय होता. यातुन असे आपल्या निदर्शनास येते की जातीनिर्मीती आणि जातीनिष्ट व्यवसाय याची अतुट अशी जुळणी झालेली आहे.

या जातीच्या उतरंडीमध्ये समाजातील सर्वात खालचा स्तर अस्पृश्य लोकांचा असल्याचे आपल्या लक्षात येते. या अस्पृश्य लोकानी समाजातील सर्व घाणेरडी कामे करायची म्हणजे रत्यांची झाडलोट करने, मेलेली गुरेढोरे ओढणे, वरिष्ट जाती सांगतील ती सर्व कामे करणे इ. यामधुन व्यक्तीची जीवन पद्धती आणि सामाजिक संबंधाचे स्वरूप जातीनुसार कळते म्हणून जातीव्यवस्था भारतीय समाजरचनेचा पाया मानला जातो. एकूणच भारतामध्ये साफसफाईची कामे काही विशिष्ट जातीवर लादण्यात आलेली होती आणि आजदेखिल काही विशिष्ट जाती साफसफाईची कामे करताना दिसून येतात. अशा व्यक्तींना सर्वसाधारणपणे सफाई कामगार म्हणून संबांधले जाते.

वेगवेगळया क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणात साफसफाईचे काम करतांना हा सफाई कामगार आपल्या निदर्शनास येतो. ज्याप्रमाणे आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ही आपली वैयक्तिक असते. त्याच प्रमाणे शहरे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी तेथिल स्थानिक स्वराज्य संस्थेची असते. त्यामूळे स्थनिक स्वराज्य संस्थेमधिल सार्वजनिक आरोग्य संभाळण्याचे कर्तव्य सफाई कामगारांना पार पाडावे लागते. भारतीय समाजावर आधुनिकतेचा प्रभाव पडला असला तरी देखील या सफाई कामगारांना वर्षानुवर्षे त्यांचा चालत आलेला पारंपारिक व्यवसाय करावा लागतो. सफाई कामगारांमध्ये झाडुवाले, मेहतर, शौचालय सफाईवाले, मैला वाहणारे, सांडपाणी व्यस्थापना कामे करणारे, भंगी अशा सर्व लोकांचा समावेश होतो.

सफाई कामगारांची व्याख्या :—

१९९३ च्या कलम २ (१) च्या अनुसार सफाई कामगार म्हणजे जी व्यक्ती मैला साफ करण्यामध्ये गुंतलेली आहे तिला सफाई कामगार म्हटले गेले. परंतु हया व्याख्येत

अगदी संकुचित अर्थ होता. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाने सन २००० मध्ये व्यापक दृष्टीकोनातून व्याख्या केलेली आहे. जी व्यक्ती रस्ता साफसफाई करणे, कचरा उटाव व त्याची विल्हेवाट लावणे, त्याचबरोबर इतर कामे जे समाजमान्य नाही. अशा प्रकारच्या कामामध्ये गुंतलेल्या व्यक्तींना सफाई कामगार म्हटले जाते.

कलम ४४ (क) सफाई कामगार याचा अर्थ रस्ते झाडण्यासाठी किंवा ते स्वच्छ करण्यासाठी किंवा केरकचरा वाहून नेण्यासाठी किंवा शौचकूप, मलप्रणाल, गटारे किंवा सार्वजनिक जागा स्वच्छ करण्यासाठी प्रत्यक्षात नोकरीवर ठेवलेला कर्मचारी वर्ग असा आहे.

आज सर्वत्र खाजगीकरण फार मोठया प्रमाणात होतांना दिसून येत आहे. त्यातच विविध ग्रामपंचायत, नगरपरिषद महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, यांनी कामगारांचा कोणत्याही प्रकारचा लोड स्वत: वर येऊ नये यासाठी ठेकेदारी पद्धतीने सफाई कामगार नेमण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे कामगारांना कोणताही लाभ देणे आवश्यक वाटत नाही. त्यांना मिळणारा भत्ता नियमानुसार न देता नाममात्र असा देवून आठ– आठ तास त्यांच्याकडून काम करवून घेत आहेत. त्यात महिला सफाई कामगारांना मिळणारी वागणूक ही तर खुपच वाईट आहे. तसेच त्यांच्याकडे मुकादम लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन कायम वेगळाच पाहावयास मिळतो. खरे पाहता सफाई कामगारांना सेवा सुविधा हॅन्डग्लोज ,बुट,सुरक्षा जॅकेट, टोपी,विमा संरक्षण व अन्य सुरक्षा पूरविण्याची सर्व जबाबदारी ही ठेकेदारावर आहे. आणि सर्वात मोठी जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर आहे.

कंत्राटी आणि स्वच्छ अभियानात काम करणा–या कामगारांना कायद्याने कोणतेही संरक्षण नसल्याने फक्त तुटपुंज्या वेतनावर त्यांची बोळवण ही केली जाते. कायम सफाई कामगार हा झोपडपटटी,रस्ते ,फुटपात,स्वच्छ करण्याचे काम करतात. तसेच कंत्राटी कामगार नाल्या, ड्रेनेज ,स्वच्छतागृहे साफ करण्याची कामे करतात. कायम अस्वच्छतेत काम केल्याने या कामगारांमध्ये आरोग्यांच्या अनेक समस्या हया मोठया प्रमाणात आपणास पहावयास

मिळतात. तसेच सतत घाणीत काम केल्याने ते दारूचा आधार घेण्यास सुद्धा धजावत नाहीत. त्यामुळे सफाई कामगारांचे शरीर खंगत गेल्याने हजारो कामगारांचे आरोग्य हे धोक्यात आलेले आपणास पाहावयास मिळते. त्यांच्या आरोग्यासाठी महारगरपालिका कागदावर अनेक योजना दाखवत असली तरी त्याचा लाभ सफाई कामगारापर्यत पोहोचत नाही. अस्वच्छतेत काम करत असल्याने सफाई कामगारांना गणवेश, साबण, टॉवेल, मास्क तसेच पावसाळयात गमबुट,रेनकोट देणे हे महानगरनपालिकेला बंधनकारक आहे. सर्वच कामगारांना या वस्तु पालिकेकडून मिळतातच असे नाही. महानगरपालिकेतील एकूण सफाई कामगारांपैकी किती कामगारांना कर्मचारी वसाहतीत घरे मिळालेली आहेत? बहुतांश कामगार झोपडपटयामध्ये राहतात. त्यामूळे त्यांचे जिवणमान खालावलेले असून त्यांना मालकी हक्कांची घरे ही देण्यास महानगरपालिका असमर्थ ठरते किंवा जाणिवपूर्वक दुर्लक्ष करते असे वाटते.

महाराष्ट्र शासनाच्या १ डिसेंबर १९९० च्या शासन निर्णयानुसार स्थायी महिला कर्मचा–यांना तीन साडया, तीन पेटीकोट,तीन ब्लाउज, चप्पल तसेच पुरूष कर्मचा–यांना टेरिकॉटचे तीन पॅन्ट, तीन शर्ट, हातमोजे, लांब बूट व सफाई कामाचे साहित्य देण्याचे प्रावधान करण्यात आलेले आहे. तसेच ,

महाराष्ट्र शासनाने सफाई कामगार लोकांसाठी त्यांच्या हितासाठी लाड समीती ही गठीत करण्यात आली व त्या समीतीने २१ मार्च २०१६ ला आपल्या अहवालातुन असे मत मांडले की, जे सफाई कामगार कायमस्वरूपी आहेत अश्या कामगारांना घरकुल योजना, महागाई भत्ता,निर्वाह निधी, सफाई कामगार पुनर्वसन, वारस हक्काने नोकरी कायदा, सफाई कामगार वीमा संरक्षण, सफाई कामगारांना कामावर असतांना विविध सुखसोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

<u>संशोधन साहित्याचे पुनरावलोकन</u> :–

सफाई कामगाराला इंग्रजीमध्ये scavenging हा शब्दप्रयोग वापरला जातो. सफाई कामगारामध्ये झाडुवाले, मेहतर, शौचालय सफाईवाले, मैला वाहणारे, सांडपाणी

व्यवस्थापनात कामे करणारे, भंगी अशा सर्व लोकांचा समावेश होतो. तरी सदरील विषयाच्या संदर्भात scavenging च्या दृष्टिकोनातून झालेल्या अभ्यासाचाही आढावा घेणे महत्वाचे ठरते.

अरूण ठाकूर आणि महमंद खडस यांनी 'नरक सफाईची गोष्ट' हे पुस्तक (१९८९) लिहिले आहे. यामध्ये त्यांनी भंगी समाजाला स्वातंत्र्यानंतर प्रत्यक्षात काय मिळाले? त्यांच्या आर्थिक –सामाजिक स्थित्यंतरासाठी काय प्रयत्न झाले? आधुनिक औद्योगिक समाजात त्यांचे स्थान काय? इतर जातीचे त्यांच्याशी, त्यांचे इतर जातीशी संबंध कसे आहेत? या प्रश्नांची उकल या पुस्तकात केलेली आहे.

बिंदेश्वर पाठक यांचे ' Road to Freedom ' हे सफाई काम (मानवी मलमूत्र स्वच्छता) करणा–यांच्या मुक्ततेचे हे एक समाजशास्त्रीय संशोधन आहे. या संशोधनासाठी 'बिहारमधील शासनाच्या योजना स्वीकारलेले, न स्वीकारलेले, भंगी कामातून मुक्त झालेले, अद्याप ते काम करणारे अशा घटकातून निवड करून अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की,इतर जातीच्या लोकांचा सफाई कामगारांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे. पूर्वीच्या काळातील कठोर निर्बध कमी झाले असले तरी पारंपरिक मान्यता अद्यापही कार्यरत आहेत.

बक्षी डी. सिन्हा, एस.के. मेनोन आणि अरूण के. घोष यांच्या 'Restoration of Human Dignity' या अभ्यासाचा उद्देश केंद्र व राज्य सरकारच्या सफाई कामगार समुदायाच्या विकासासाठी असलेल्या विविध योजना व कार्यक्रमामूळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक दर्जात बदल झाला का? हे पाहणे तसेच या योजनांच्या कार्यवाहीचे मूल्यमापन करणे अशा स्वरूपाचा होता. सामान्यपणे अनुसूचित जातींच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न झाले असले तरी सफाई कामगारांच्या (भंगी समााजाच्या)समस्या सोडविण्यासाठी विशेष गंभीरपणे प्रयत्न झालेले नाहीत. अनुसूचित जातीगटातील सर्वात कनिष्ठ विभागातील या समूदायाला झालेल्या फायद्याबाबत फारच कमी व प्रभावहीन माहिती मिळाली.

बी.एन.श्रीवास्तव यांनी 'Manul Seavnging in India:A Disgrace to the country' या प्रस्तुत अध्ययनात भारतातील भंगी जातीचे मूळ,त्यांचे सामाजिक आणि आर्थिक स्थान, जाती संघटन तसेच केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्वयंसेवी संस्था यांनी केलेल्या सुधारणा आणि इतर घटकांचे अध्ययन करण्यात आलेले आहे. यामध्ये सांस्कृतिक आणि स्थानिक वारसा याचाही समावेश केला आहे. या अभ्यासातील निष्कर्ष काढला की,अस्पृश्तेचा अभिशाप दूर करण्यासाठी , त्यामूळे होणारा अत्याचार, अपमान टाळण्यासाठी मोठया प्रमाणात भंगी लोकांनी, विशेषत: उत्तर भारतातील भंगी लोकांनी हिंदू धर्म सोडून इस्लाम (मुस्लिम) धर्म स्वीकारला तर काहींनी खिचन आणि शीख धर्म स्वीकारला. जरी या धर्मामध्ये जातीयतेला स्थान नाही, तसेच सर्व माणसांना समान दर्जा आहे असे असले तरी हे धर्म स्वीकारल्यामूळे या जातीच्या व्यवसायात किंवा सामाजिक दर्जात कोणताच महत्वपूर्ण बदल झालेला पहायला मिळत नाही.

स्टीफन फ्युश यांनी 'At the Bottom of Indian Society' या ग्रंथात भारतीय समाजातील तळाशी असलेल्या अस्पृश्यतेविषयी आपली भूमिका मांडत असताना आताच्या काळात अस्पृश्य लोकांची स्थिती बऱ्यापैकी सुधारलेली आहे. अस्पृश्यांशी अंतर ठेवून संबंध वा बोलण्याची प्रथा आता पाळत नाहीत, सार्वजनिक ठिकाणी त्यांनी प्रवेश मिळत आहे. केवळ काही ठिकाणी त्यांना अंशत:प्रवेश मिळते, तसेच इतर संस्था, संघटना त्यांना आर्थिक आणि नैतिक सहकार्य करतात. परंतू आजही त्यांना त्यांच्या कमी सामाजिक दर्जामूळे सामाजिक अवहेलनाच सहन करावी लागते. ज्या बहुतेक ठिकाणी हे लोक आपला मानवी हक्क दाखवण्याचा प्रयत्न करतात,त्यावेळी त्यांना इतर बहुसंख्य हिंदूकडून विरोध, अन्याय होतो.

अर्चना सिन्हा यांनी 'An Overview of Scavenger's Problem' या लेखात भंगी लोकांचे ग्रामीण आणि शहरी भागातील चित्र भिन्न आहे. शहरामध्ये राहणारा भंगी महानगरपालिका, नगरपालिका, महामंडळ, दवाखाने, महाविद्यालय, वसतिगृह, प्रसुतीगृह आणि इतर संस्थांमध्ये काम करतो. त्यामूळे आपली संघटना किंवा व्यावसासयिक संघ

निर्माण करण्यास ते सक्षम आहेत. जर एखद्या बाबतीत त्यांचे त्यांच्या मालकाशी किंवा वरिष्ठ अधिका–याशी वाद झाले तर ते न घाबरता त्याला वठणीवर आणतात, आपली बाजू मांडतात. ग्रामीण भागात व्यक्तीगत दर्जापेक्षा सामुहिक दर्जाला महत्व आहे, त्यामूळे व्यक्तीला तेवढी किंमत नाही. त्यांचा दर्जा सामुहिकपणे ठरतो. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील काम करण्याची स्थिती आणि पद्धत ही शहरांपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे.

प्रस्तुत अध्ययनात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत काम करणा–या सफाई कामगारांच्या मानवी हक्कांचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच सफाई कामगारांच्या सामाजिक दर्जाचा, त्यांच्या आर्थिक व शैक्षणीक स्थितीचा व तसेच या सफाई कर्मचा–यांसाठी असलेल्या शासकिय योजनांमुळे सफाई कामगारांच्या राहणीमानात सुधारणा झाली का? त्यांना शैक्षणीक सुविधांचा लाभ मिळतो का? त्यांना त्यांच्या आरोग्याच्या सुविधांचा लाभ मिळतो का? यामूळे दुर्लक्षित असलेल्या महानगरपालिका कामगारांच्या सामाजिक व आर्थिक तसेच मानवी हक्कांच्या निगडीत समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात येतील त्यामूळेच सदरील अभ्यासाला अनन्य साधारण महत्व आहे.

संशोध न पद्धती:–

सदर विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक तसेच दुय्यम साधनांचा वापर केला जाणार आहे. या संशेधनासाठी प्राथमिक साधन म्हणुन मुलाखत अनुसुची, सहभागी निरिक्षण पद्धती, व्यष्टी अध्ययन, गटचर्चा इ. तंत्राचा वापर करण्यात येईल तसेच दुय्यम साधनं म्हणुन सफाई कामगारांवर लिखीत साहित्य , अहवाल, लेख, महाराष्ट्र शासनाचे जी.आर, संदर्भ ग्रंथ, मासीके, त्रैमासीके, वृत्तपत्रातील लेख, प्रकाशीत, अप्रकाशित शोध प्रबंध, इंटरनेट सेवा इ. स्त्रोतांचा वापर हा तथ्य संकलनासाठी करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दीष्टये :—

१. महानगरपालिकेतील सफाई कामगारांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थिती जाणून घेणे आणि त्यांच्या सामाजिक दर्जाचा शोध घेणे.

२. महानगरपालिकेतील सफाई कामगार म्हणून कार्य करीत असतांना समाज आणि प्रशासकीय पातळीवरील मानखंडनात्मक व्यवहारांचा अभ्यास करणे.

३. महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या मानवी हक्कांचा अभ्यास करणे.

४. महानगरपालिकेतील सफाई कामगारासाठीच्या योजनांचा अभ्यास करणे.

५. महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या कामाचे स्वरूप तसेच आरोग्यविषयक प्रश्नांचा आभ्यास करणे.

संशोधन प्रश्न :—

१) महानगरपालिकेतील सफाई कामगारांची आर्थिक,शैक्षणीक आणि सामाजिक स्थिती कशी आहे?

२) महानगरपालिकेतील सफाई कामगारांचा सामाजिक दर्जा कसा आहे?

३) महानगरपालिकेतील सफाई कामगारांना त्यांच्या मानवी हक्कांची जाणीव आहे का?

४) महानगरपालिकेतील सफाई कामगारांना सामाज आणि प्रशासकिय पातळीवर मानखंडनात्मक व्यवहाराचा सामना करावा लागतो आहे का?

५) महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी कोणत्या शासकिय योजना आहेत?

अध्ययन क्षेत्र :—

नांदेड जिल्हा हा महाराष्ट्रराज्यातील दक्षिण—पूर्वेस व तेलंगाना व कर्नाटक राज्याच्या सीमेलगत आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा भागात असलेल्या जिल्हयाला ऐतिहासीक महत्व आहे. नांदेड शहरांचे एकुण क्षेत्रफळ १०,५२८ चौ.कि.मी असुन,नांदेड शहराचे क्षेत्रफळ हे ८० चौ.कि.मी. आहे. नांदेड जिल्हयाची २०११ च्या जणगणनेणुसार एकून लोकसंख्या ३३,६१,२९२ एवढी असून त्यात नांदेड शहरांची लोकसंख्या हि ९,१३,८९८ एवढी असून २००१ च्या तूलनेत ही १६.८६ टक्के ने वाढलेली आपणास पाहावयास मिळते. .तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात असून तिची स्थापना १९९७ मध्ये झालेली असून महानगरपालिकेत सध्या कायम तसेच कंत्राटी स्वरूपातील सफाई कामगारांची संख्या ही ८८० एवढी असून शहरी लोकसंख्येच्या मांनाने कमी वाटते. झपाटयाने पसरणा—या नांदेड शहरात सफाई कामगारांची संख्या पाहता त्यांच्या सामाजिक दर्जाची ,आर्थिक व राजकिय स्थितीची, मानखंडनात्मक व्यवहाराचा तसेच शासकिय योजनांच्या सुविधांचा एकूण विचार करता सफाई कामगारांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. म्हणून प्रस्तुत विषयाचा मानव आधिकाराच्या दृष्टिकोणातून अभ्यास करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा अभ्यास क्षेत्रासाठी निवड केलेली आहे.

संशोधनाचा आराखडा :—

प्रस्तुत संशोधनात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत काम करणा—या सफाई कामगारांचा चिकित्सक अभ्यास केला जाणार असून त्याची मांडणी एकूण पाच प्रकरणांमध्ये केली जाणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

प्रकरण पहिले
प्रस्तावना

या शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका अंतर्गत काम करणा—या सफाई कामगारांच्या सामाजिक ,आर्थिक, राजकिय स्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे
संशोधन साहित्याचा आढावा

शोधनिबंधाच्या दुस—या प्रकरणामध्ये सफाई कामगारांच्या विषयक केलेल्या संशोधणाचा, सामाजिक संस्थाचे कार्य तसेच सफाई कामगाऱ्याच्या संदर्भात कार्य करणा—या व्यक्तीचे लेख यांचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे
संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तिस—या प्रकरणामध्ये संशोधन पद्धतिशास्त्र ,संशोधनाच्या पद्धती,तथ्यसंकलणाचे स्त्रोत यांची मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण चौथे
सफाई कामगाराच्या मानवी हक्कांच्या स्थितीचे विश्लेषण

प्रस्तुत शोधनिबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये सफाई कामगारांच्या मानवी हक्काच्या समाजिक,आर्थिक,तसेच मानखंडणात्मक स्थितीचे केलेले तथ्य संकलन याचे विश्लेषण करणार आहोत.

प्रकरण पाचवे
निष्कर्ष,सारांश,सैध्दांतीक संबंध.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये सदर संशोधणाचा सारांश आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आंतर्गत काम करणा—या सफाई कर्मचा—यासंदर्भातील निष्कर्षाची मांडणी करणार आहोत.

संदर्भ सूची

- **Ghurye,caste and Race in India 1996-**
- संजय सोनवणी ,जातीसंस्थेचा इतिहास . प्राजक्त प्रकाशन,पुणे.
- ए.वाय.कोडेकर ,भारतीय समाज,फडके पब्लिकेशन कोल्हापुर
- खुदशाह संजीव (२६ जाने२००९),'सफाई कामगार समुदाय' , सुगावा प्रकाशन, पुणे.
- वाल्मिकी ओमप्रकाश (२०११),'सफाई देवता',सायन पब्लिकेशन्स, नारायण पेठ, पुणे.
- दास भगवान (१९९८), 'वाल्मिकी जयंती और भंगी जातीयॉ' गौतम बुक सेन्टर, दिल्ली.
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम (१९६५), प्रकाशन, महाराष्ट राज्य ,मुंबई.
- अरूण ठाकूर आणि महमंद खडस (१९८९)'नरक सफाईची गोष्ट',मुंबई.
- Bindeshwar pathak (1994): Road to Freedom, Motilal Banarshidas Publishers Pvt.Ltd., New Delhi.
- Bakshi D.Sinha, p.s.k. Menon and Arun K. Ghosh(1994): "Restoration of Human Dignity", (Council for Social Development) Arnold Puvlication, New Delhi.
- B.N Srivastava (1997) : " Manual Seavenging in India Disgrace to the country". Concept Publishing Company.New Delhi.
- नाडगोंडे गुरूनाथ (१९८६),'सामाजिक संशोधन पद्धती',फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- विवक सौताडेकर ,आपला नांदेड जिल्हा,विद्याभारती प्रकाशन,लातूर

संशोधक

गजभारे सुमित

संशोधक मार्गदर्शक

डॉ.अनिलकुमार जायभाये

समाजशास्त्र विभाग प्रमुख

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वा.रा.ती. म.उपपरिसर

लातूर

Dr.A.V.Jayabhaye
Research Supervisor in Sociology
School of Social Sciences
SRTMUN, Sub Campus.Latur